24 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात गुरुवारी जीवनमुक्ती सेवा संस्था व्हाईट आर्मीतर्फे खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांना 'आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी डावीकडून अभिषेक मिठारी, सुभाष दळवी, उमेशचंद्र सारंगी, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. डी. टी. शिर्के, अशोक रोकडे, अमोल येडगे, समरजितसिंह घाटगे, व्ही. बी. पाटील आदी.

(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा) (बातमी पान ३ व

# आपत्तीकाळात काम करणाऱ्यांना पाठबळ द्या

## ज्येष्ठ नेते शरद पवार : व्हाईट आर्मीतर्फे ‘आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा’ पुरस्काराने सन्मान

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २३ : आपत्ती काळात मदत, बचाव कार्य करणे जोखमीचे असते. अशा स्थितीत देशभरातील व्हाईट आर्मीसारख्या अनेक सेवाभावी संस्था, एनजीओ धावून जात काम करतात. एक नागरिक म्हणून त्यांना पाठबळ द्या, असे आवाहन ‘राष्ट्रवादी’चे अध्यक्ष व ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी केले.**

### ‘सकाळ रिलीफ फंडा’चा गौरव

■ २६ जानेवारी २००१ रोजी गुजरातमधील कच्छ परिसरात मोठा भूकंप झाला. त्यात मोठी वित्त आणि जीवितहानीही झाली होती. या भूकंप दुर्घटनेत तेरा हजार आठशे नागरिक मृत्युमुखी पडली होते. तसेच शेकडो नागरिक जखमी व बेघर झाले होते. त्यावेळी सकाळ रिलीफ फंड अंतर्गत तातडीची मदत म्हणून बारा लाख रुपयांचा निधी जमा करून रक्त संकलन करण्यासाठी रुग्णवाहिका गुजरात राज्याला पाठविली. तसेच तीन कोटी रुपये खर्च करून प्रभावित भागातील सत्तर शाळांचे नूतनीकरण, बांधकाम व एका वसतिगृहाची उभारणी सकाळ रिलीफ फंडातून करण्यात आली. या भूकंपाला आणि त्यानंतरच्या पुनर्वसनाला २५ वर्षं पूर्ण झाल्याबद्दल सकाळ रिलीफ फंडाचाही या कार्यक्रमात ‘व्हाईट आर्मी’तर्फे आपत्ती व्यवस्थापन योद्धा पुरस्काराने गौरव करण्यात आला. सकाळ कोल्हापूरचे मुख्य बातमीदार निवास चौगले आणि वरिष्ठ बातमीदार संतोष मिठारी यांनी हा पुरस्कार श्री. पवार यांच्या हस्ते स्वीकारला.



**कोल्हापूर :** सकाळ रिलीफ फंडाचा ‘व्हाईट आर्मी’तर्फे गुरुवारी शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात ‘राष्ट्रवादी’चे अध्यक्ष व ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या हस्ते आपत्ती व्यवस्थापन योद्धा पुरस्काराने गौरव करण्यात आला. सकाळ कोल्हापूरचे मुख्य बातमीदार निवास चौगले आणि वरिष्ठ बातमीदार संतोष मिठारी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी डावीकडून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, व्हाईट आर्मीचे संस्थापक अध्यक्ष अशोक रोकडे, खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज आदी उपस्थित होते. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात जीवनमुक्ती सेवा संस्था व्हाईट आर्मीतर्फे खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते श्री. पवार यांना ‘आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या सन्मानाला उत्तर देताना श्री. पवार बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी अमोल येडगे प्रमुख उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, ‘आपत्ती काळात झोकून देऊन काम करणाऱ्या ‘व्हाईट आर्मी’चा पुरस्कार मी अंतःकरणापासून स्वीकारत आहे. किल्लारी, कच्छ-भूजमधील भूकंप असो की, मुंबई बॉम्बस्फोट त्याठिकाणी तातडीने जाऊन मदतकार्याचे व्यवस्थापन केले. त्यात सामाजिक, सेवाभावी संस्था, शासकीय यंत्रणा, अधिकाऱ्यांनीही चांगले काम केले. अशा पद्धतीने आपत्तीवेळी काम करणाऱ्यांना नागरिकांनी पाठबळ दिले, तर कोणत्याही मोठ्या आपत्तीचा आपल्याला सहजपणे सामना करता येईल. जपान, कॅलिफोर्नियासह इतर देशांचा तत्कालीन शासकीय अधिकारी पी. के. मिश्रा यांच्यासमवेत दौरा करून आपत्ती व्यवस्थापन कायदा तयार करण्यात योगदान दिले. सध्या हाच कायदा देशभरात कार्यरत आहे.’

खासदार शाहू छत्रपती म्हणाले, ‘देशासह राज्यात ज्या-ज्यावेळी आपत्ती आली. त्यावेळी तातडीने धावून जात श्री. पवार यांनी मदत केली आहे. व्हाईट आर्मीने सन्मानासाठी योग्य व्यक्तीची निवड केली आहे.’

निवृत्त सनदी अधिकारी उमेशचंद्र सारंगी, नितीन गद्रे, दत्तात्रय मेतके, सुभाष दळवी, हेमंत परब, आर. डी. पाटील, सर्जेराव बनकर, आनंद माने, कोल्हापूर हॉटेल मालक संघ, पाटीदार समाज यांना आपत्ती व्यवस्थापन योद्धा पुरस्कार श्री. पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ‘व्हाईट आर्मी’चे संस्थापक अध्यक्ष अशोक रोकडे यांनी प्रास्ताविकातून संस्थेची वाटचाल मांडली. यावेळी सरोज (माई) पाटील, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ‘शाहू ग्रुप’चे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे, ‘राष्ट्रवादी’चे जिल्हाध्यक्ष व्ही. बी. पाटील, शहराध्यक्ष आर. के. पोवार, उद्योजक एम. बी. शेख आदी उपस्थित होते. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अमोल कोडोलीकर यांनी आभार मानले.

### घसा दुखावला असल्याने मी आता थांबतो

सकाळपासून माझा घसा दुखावला असून, आता मला बोलायला मर्यादा येत आहेत. त्यामुळे मी आता थांबतो, असे म्हणत श्री. पवार यांनी भाषणाचा शेवट केला. त्यांनी व्यासपीठावर उभे राहून २३ मिनिटे भाषण केले. आपत्ती व्यवस्थापनातील जुन्या आठवणींना उजाळा दिला.

### थेट पंतप्रधानांना सांगितले की, तुम्ही येऊ नका

कच्छ, भूज भूकंपावेळी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी सर्वपक्षीय बैठक घेतली. त्यात सर्वांनीच माझे नाव पुढे केल्याने या भूकंपावेळी मी आपत्ती व्यवस्थापनात पुढाकार घेतल्याचे श्री. पवार यांनी सांगितले. किल्लारी भूकंपावेळी तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव यांनी तेथील परिस्थिती पाहण्यासाठी येतो असे कळविले. त्यावर तुम्ही येथे आलात, तर सर्व यंत्रणा तुमच्यामागे ठेवावी लागेल आणि आपत्ती व्यवस्थापन विस्कळीत होईल. त्यामुळे तुम्ही येऊ नका, अशी विनंती त्यांना मी केली. त्यांनीही मोठ्या मनाने मान्य केल्याचे श्री. पवार यांनी सांगितले.

24 JAN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आपत्तीत काम करणाऱ्यांना बळ द्या

## शरद पवार यांचे आवाहन : 'व्हाईट आर्मी'तर्फे आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा पुरस्काराने केला सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापुरातील व्हाइट आर्मी व शिवाजी विद्यापीठाच्या शिव-सहाय्यता आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्यावतीने ज्येष्ठ नेते शरद पवार यांना गुरुवारी आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा पुरस्काराने खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी अमोल येडगे, समरजित घाटगे व व्ही. बी. पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

**कोल्हापूर :** आपत्तीच्या काळात महाराष्ट्रातील शासकीय यंत्रणा, अधिकारी व स्वयंसेवी संस्था उत्कृष्ट काम करतात याचा अनुभव वेळोवेळी आला आहे. त्यामुळे अशा काळात काम करणाऱ्या शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्थांना नागरिकांनी बळ दिले तर कोणत्याही संकटांचा आपण सहजपणे सामना करू शकू, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार शरद पवार यांनी गुरुवारी व्यक्त केला.

कोल्हापुरातील व्हाइट आर्मी व शिवाजी विद्यापीठाच्या शिव-सहाय्यता आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्यावतीने पवार यांना आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा पुरस्काराने खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात झालेल्या या कार्यक्रमावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, निवृत्त सनदी अधिकारी उमेशचंद्र सारंगी उपस्थित होते. शरद पवार म्हणाले, लातूर भूकंपावेळी शासकीय अधिकाऱ्यांनी, काही स्वयंसेवी संस्थांनी उत्कृष्ट काम केले. आपत्तीच्या काळात महाराष्ट्रातील शासकीय यंत्रणा चांगले काम करते, असा अनुभव आहे. त्यामुळे त्यांना बळ देण्याची आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

शाहू छत्रपती म्हणाले, भूज येथील भूकंपावेळी पवार यांनी महाराष्ट्र पॅटर्न वापरून सर्वसामान्यांना दिलासा देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. व्हाइट आर्मीचे संस्थापक अशोक रोकडे यांनी शालेय अभ्यासक्रमात आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रमाचा समावेश करावा. तसेच कोल्हापुरात आपत्ती व्यवस्थापन संदर्भातील विद्यापीठ व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. अमोल कोडोलीकर यांनी आभार मानले. यावेळी समरजित घाटगे, सरोज पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एम. बी. शेख, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष व्ही. बी. पाटील, शहराध्यक्ष आर. के. पोवार उपस्थित होते.

### यांचा झाला गौरव

राज्याचे माजी निवृत्त प्रधान सचिव उमेशचंद्र सारंगी, निवृत्त उपसचिव दत्तात्रय मेतके, बृहन्मुंबई महापालिकेचे निवृत्त विशेष कार्यकारी अधिकारी सुभाष दळवी, बृहन्मुंबई महापालिका अग्निशमन दलाचे सर्जेराव बनकर, नंदकुमार काटकर, कोल्हापूर हॉटेल मालक संघ, पाटीदार समाज यांचा व्हाइट आर्मीच्यावतीने 'आपत्ती व्यवस्थापन योद्धा पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला.

### अन् कायदा झाला

कच्छ, भूज भूकंपावेळी अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान होते. त्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलवून यातून मार्ग काढण्याची विनंती केली. यावेळी सर्वांनीच माझे नाव पुढे केल्याने या भूकंपावेळी मी आपत्ती व्यवस्थापनात पुढाकार घेतला. केंद्रात मंत्री असताना मी व तत्कालीन सचिव पी. के. मिश्रा तीन-चार देशात गेलो, तेथील आपत्ती व्यवस्थापनाच्या यंत्रणा पाहिल्या अन् त्यातूनच आपत्ती व्यवस्थापन कायदा झाल्याचे पवार यांनी सांगितले.

### घसा खराब तरी भाषण

शरद पवार यांची प्रकृती सकाळपासून खराब असतानाही त्यांचे दिवसभर महाराष्ट्रात दौरे सुरू होते. विद्यापीठातील झालेल्या कार्यक्रमावेळी त्यांचा घसा प्रचंड दुखत असतानाही त्यांनी उभे राहू २५ मिनिटे भाषण केले. त्याला श्रोत्यांनी दाद दिली.

24 JAN 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून विज्ञान जगताला नवा सिद्धांत

## प्रा. ज्योती जाधव, शुभम सुतार यांनी मांडले 'शुभज्योत समीकरण'

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया आणि शुद्धीकरण या जगाला भेडसावणाऱ्या समस्येच्या अनुषंगाने संशोधन करताना शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागातील संशोधकांनी जागतिक ॲडसॉर्पशन विज्ञान जगताला 'थिअरी ऑफ पोअर कॉन्फ्लेशन' या नव्या सिद्धांताची आणि 'शुभज्योत इक्वेशन' या नव्या समीकरणाची देणगी दिली आहे.

जागतिक आघाडीच्या दोन टक्के शास्त्रज्ञांमध्ये समाविष्ट असलेल्या ज्येष्ठ संशोधक प्रा. डॉ. ज्योती जाधव आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी शुभम सुतार यांनी हे संशोधन केले आहे. 'स्प्रिंजर नेचर'च्या प्रतिष्ठित 'बायोचार' या शोधपत्रिकेमध्ये नुकताच त्यांचा 'थिअरी ऑफ पोअर कॉन्फ्लेशन' अँन्ड 'शुभज्योत इक्वेशन' इन दि ट्रिटमेंट ऑफ ब्रिलियंट ग्रीन डाय-कॉन्टॅमिनेटेड वॉटर युजिंग जामून लिव्हज बायोचार' हा तब्बल २८ पृष्ठांचा शोधनिबंध प्रकाशित झाला आहे.

प्रा. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शुभम याने जांभळाच्या पानांपासून बायोचार तयार केला. पण, या निर्मितीपुरतेच मर्यादित न राहता बायोचारच्या शोषण (ॲडसॉर्पशन) क्षमतेमधील वृद्धीचे विश्लेषण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यातून 'पोअर कॉन्फ्लेशनचा सिद्धांत' साकारला. हा सिद्धांत तापमानाच्या अनुषंगाने बायोचारच्या शोषणक्षमता वृद्धीचे स्पष्टीकरण देतो. या सिद्धांतामुळे ॲडसॉर्पशन विज्ञानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांना पुढील संशोधन अधिक गतिमान होण्यासाठी मदत होणार आहे. 'शुभज्योत समीकरणा'मध्ये 'ट्रान्झिएन्ट ॲडसॉर्पशन कपॅसिटी' या संकल्पनेचा नव्याने समावेश केला आहे. बायोचारच्या शोषण क्षमतेमध्ये क्षणाक्षणाला काय परिवर्तन होते, ती संपृक्ततेच्या बिंदूपर्यंत (इक्विलिब्रियम) कशी बदलत जाते, या सर्वच गोष्टींचे स्पष्टीकरण हे समीकरण करते.



कोल्हापूर : नवा सिद्धांत, समीकरणाची देणगी देणाऱ्या संशोधक डॉ. ज्योती जाधव आणि शुभम सुतार यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.

> मार्गदर्शक प्रा. जाधव यांनी संशोधन पुढे घेऊन जाण्यास सातत्याने प्रोत्साहित केले. त्यामुळेच सिद्धांत आणि समीकरण एकाच वेळी मांडता आले, याचे समाधान वाटते. 'महाज्योती' शिष्यवृत्तीमुळे मला हे संशोधन करता आले.
>
> \- शुभम सुतार, संशोधक विद्यार्थी

> या संशोधनाचे संपूर्ण श्रेय हे शिवाजी विद्यापीठाचे आहे. या संशोधनाची सारी विश्लेषण प्रक्रिया जैवतंत्रज्ञान अधिविभागासह विविध अधिविभाग, सी.एफ.सी. येथे उपलब्ध शास्त्रीय उपकरणांवर केली आहे. सर्व प्रशासकीय घटकांचे पाठबळ या आधारावरच संशोधनाच्या क्षेत्रात इतकी मोठी झेप घेता आली.
>
> -प्रा. ज्योती जाधव

> एखादा सिद्धांत किंवा समीकरण मांडणे आणि त्याचे जागतिक विज्ञान क्षेत्राकडून स्वागत होणे, या अत्यंत दुर्मीळ घटना असतात. त्यामध्ये प्रा. जाधव, शुभम सुतार यांनी स्थान मिळविले असून, याचा विद्यापीठ परिवाराला सार्थ अभिमान आहे.
>
> -डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

24 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# औद्योगिक सांडपाणी शुद्धीकरण संशोधनाला दिशा

- शिवाजी विद्यापीठाकडून दिला नवा सिद्धांत व समीकरण
- प्रा. ज्योती जाधव व शुभम सुतार यांचे संशोधन केंद्रीत
- जांभळाच्या पानापासून बायोचार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागात गेल्या वीस वर्षांपासून औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया, शुद्धीकरण व व्यवस्थापनच्या अनुषंगाने संशोधन सुरू आहे. वस्त्रोद्योगातील कारखान्यांमधून पाण्यात मिसळणाऱ्या घातक रंगद्रव्यावर प्रक्रिया करून सांडपाणी नैसर्गिक पद्धतीने शुद्ध करण्याच्या संशोधनाला दिशा मिळाली आहे. यासाठी प्रा. ज्योती जाधव व शुभम सुतार यांचे संशोधन केंद्रित आहे.

निसर्गातील विविध सेंद्रिय घटकांचा वापर करून 'बायोचार' हा सांडपाण्यातून रंग–प्रदूषके शोषून घेणारा स्पंजसारखा सच्छिद्र पदार्थ निर्माण करणे आणि त्याची शोषण क्षमता वाढवित जाऊन संबंधित सांडपाण्याचे जास्तीत जास्त शुद्धीकरण करणे, अशी या संशोधनाची दिशा आहे. ज्येष्ठ संशोधक डॉ. ज्योती जाधव आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी शुभम सुतार यांनी हे संशोधन केले आहे.



कोल्हापूर : डॉ. ज्योती जाधव आणि शुभम सुतार यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील.

औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया आणि शुद्धीकरण समस्येच्या अनुषंगाने संशोधन करीत असताना शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागातील संशोधकांनी जागतिक ॲडसॉर्पशन विज्ञानाच्या क्षेत्राला 'थिअरी ऑफ पोअर कॉन्फ्लेशन' व 'शुभज्योत इक्वेशन' नव्या सिद्धांत व समीकरणाची देणगी दिली आहे.

प्रा. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शुभम सुतार या संशोधक विद्यार्थ्याने जांभळाच्या पानांपासून बायोचार तयार केला. पण या निर्मितीपुरतेच मर्यादित न राहता बायोचारच्या शोषण (ॲडसॉर्पशन) क्षमतेमधील वृद्धीचे विश्लेषण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यातून 'पोअर कॉन्फ्लेशनचा सिद्धांत' साकारला. वैज्ञानिक जगतात प्रथमच अशा स्वरुपाची मांडणी झालेली आहे. या सिद्धांतामुळे ॲडसॉर्पशन विज्ञानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांना पुढील संशोधन अधिक गतिमान होण्यासाठी मदत होणार आहे. सर्व प्रकारच्या पाणी शुद्धीकरण करणारे रिॲक्टर तयार करताना या सिद्धांताचा वापर होणार आहे.

### यशाचे श्रेय शिवाजी विद्यापीठाचे

संशोधनाची विश्लेषण प्रक्रिया शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागासह विविध अधिविभाग आणि मध्यवर्ती सुविधा केंद्रात (सी.एफ.सी.) उपलब्ध शास्त्रीय उपकरणांवर करण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह प्रशासनाच्या पाठबळाने संशोधनाला प्रेरणा मिळाली असल्याचे प्रा. ज्योती जाधव यांनी सांगितले.

### मार्गदर्शकाचा विश्वास सार्थ

संशोधन करीत असताना साशंकता वाटायची. मात्र प्रा. जाधव यांनी मात्र संशोधनास प्रोत्साहन दिले. त्यामुळेच सिद्धांत आणि समीकरण एकाच वेळी मांडता आले, याचे समाधान वाटते. यामध्ये मार्गदर्शकांची मोलाची भूमिका आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या 'महाज्योती' शिष्यवृत्तीमुळे मला हे संशोधन करता आले असल्याचे शुभम सुतार यांनी सांगितले.

### संशोधकांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित

शिवाजी विद्यापीठाचे भौगोलिक स्थान कोठेही असले तरी संशोधनाच्या क्षेत्रात ते जागतिक स्तरावर सातत्याने मान्यताप्राप्तच राहिलेले आहे. जागतिक आघाडीच्या २ टक्के संशोधकांमध्ये समावेश असलेल्या प्रा. ज्योती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शुभम सुतार यांनी मांडलेला नवा सिद्धांत आणि समीकरण हे या संशोधकांनी चालविलेल्या सातत्यपूर्ण संशोधनाचे फलित आहे.

– कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, शिवाजी विद्यापीठ

27 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# औद्योगिक सांडपाणी शुद्धीकरण संशोधनाला दिशा

- शिवाजी विद्यापीठाकडून दिला नवा सिद्धांत व समीकरण
- प्रा. ज्योती जाधव व शुभम सुतार यांचे संशोधन केंद्रीत
- जांभळाच्या पानापासून बायोचार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागात गेल्या वीस वर्षांपासून औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया, शुद्धीकरण व व्यवस्थापनच्या अनुषंगाने संशोधन सुरू आहे. वस्त्रोद्योगातील कारखान्यांमधून पाण्यात मिसळणाऱ्या घातक रंगद्रव्यावर प्रक्रिया करून सांडपाणी नैसर्गिक पद्धतीने शुद्ध करण्याच्या संशोधनाला दिशा मिळाली आहे. यासाठी प्रा. ज्योती जाधव व शुभम सुतार यांचे संशोधन केंद्रित आहे.

निसर्गातील विविध सेंद्रिय घटकांचा वापर करून 'बायोचार' हा सांडपाण्यातून रंग-प्रदूषके शोषून घेणारा स्पंजसारखा सच्छिद्र पदार्थ निर्माण करणे आणि त्याची शोषण क्षमता वाढवित जाऊन संबंधित सांडपाण्याचे जास्तीत जास्त शुद्धीकरण करणे, अशी या संशोधनाची दिशा आहे. ज्येष्ठ संशोधक डॉ. ज्योती जाधव आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी शुभम सुतार यांनी हे संशोधन केले आहे.



कोल्हापूर : डॉ. ज्योती जाधव आणि शुभम सुतार यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील.

औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया आणि शुद्धीकरण समस्येच्या अनुषंगाने संशोधन करीत असताना शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागातील संशोधकांनी जागतिक ॲडसॉर्पशन विज्ञानाच्या क्षेत्राला 'थिअरी ऑफ पोअर कॉन्फ्लेशन' व 'शुभज्योत इक्वेशन' नव्या सिद्धांत व समीकरणाची देणगी दिली आहे.

प्रा. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शुभम सुतार या संशोधक विद्यार्थ्याने जांभळाच्या पानांपासून बायोचार तयार केला. पण या निर्मितीपुरतेच मर्यादित न राहता बायोचारच्या शोषण (ॲडसॉर्पशन) क्षमतेमधील वृद्धीचे विश्लेषण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यातून 'पोअर कॉन्फ्लेशनचा सिद्धांत' साकारला. वैज्ञानिक जगतात प्रथमच अशा स्वरुपाची मांडणी झालेली आहे. या सिद्धांतामुळे ॲडसॉर्पशन विज्ञानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांना पुढील संशोधन अधिक गतिमान होण्यासाठी मदत होणार आहे. सर्व प्रकारच्या पाणी शुद्धीकरण करणारे रिॲक्टर तयार करताना या सिद्धांताचा वापर होणार आहे.

### यशाचे श्रेय शिवाजी विद्यापीठाचे

संशोधनाची विश्लेषण प्रक्रिया शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागासह विविध अधिविभाग आणि मध्यवर्ती सुविधा केंद्रात (सी.एफ.सी.) उपलब्ध शास्त्रीय उपकरणांवर करण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह प्रशासनाच्या पाठबळाने संशोधनाला प्रेरणा मिळाली असल्याचे प्रा. ज्योती जाधव यांनी सांगितले.

### मार्गदर्शकाचा विश्वास सार्थ

संशोधन करीत असताना साशंकता वाटायची. मात्र प्रा. जाधव यांनी मात्र संशोधनास प्रोत्साहन दिले. त्यामुळेच सिद्धांत आणि समीकरण एकाच वेळी मांडता आले, याचे समाधान वाटते. यामध्ये मार्गदर्शकांची मोलाची भूमिका आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या 'महाज्योती' शिष्यवृत्तीमुळे मला हे संशोधन करता आले असल्याचे शुभम सुतार यांनी सांगितले.

### संशोधकांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित

शिवाजी विद्यापीठाचे भौगोलिक स्थान कोठेही असले तरी संशोधनाच्या क्षेत्रात ते जागतिक स्तरावर सातत्याने मान्यताप्राप्तच राहिलेले आहे. जागतिक आघाडीच्या २ टक्के संशोधकांमध्ये समावेश असलेल्या प्रा. ज्योती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शुभम सुतार यांनी मांडलेला नवा सिद्धांत आणि समीकरण हे या संशोधकांनी चालविलेल्या सातत्यपूर्ण संशोधनाचे फलित आहे.

– कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, शिवाजी विद्यापीठ

24 JAN 2025 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून ''थिअरी ऑफ पोअर कॉन्फ्लेशन', 'शुभज्योत समीकरण'ची देणगी

## प्रा. ज्योती जाधव व शुभम सुतार यांचे संशोधन; विज्ञान जगताला नवा सिद्धांत

कोल्हापूर : प्रतिनिधी

औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया आणि शुद्धीकरण या जगाला भेडसावणाऱ्या समस्येच्या अनुषंगाने संशोधन करताना शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागातील संशोधकांनी जागतिक ॲडसॉर्पशन विज्ञानाच्या क्षेत्राला 'थिअरी ऑफ पोअर कॉन्फ्लेशन' या नव्या सिद्धांताची तसेच 'शुभज्योत इक्वेशन' या नव्या समीकरणाची देणगी दिली आहे. जागतिक आघाडीच्या २ टक्के शास्त्रज्ञांमध्ये समाविष्ट असलेल्या ज्येष्ठ संशोधक डॉ. ज्योती जाधव आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी शुभम सुतार यांनी हे संशोधन केले आहे. 'स्प्रिंजर नेचर'च्या प्रतिष्ठित 'बायोचार' या शोधपत्रिकेमध्ये नुकताच त्यांचा 'थिअरी ऑफ पोअर कॉन्फ्लेशन' ॲंड 'शुभज्योत इक्वेशन' इन दि ट्रिटमेंट ऑफ ब्रिलियंट ग्रीन डाय-कॉन्टॅमिनेटेड वॉटर युजिंग जामून लिव्हज् बायोचार' हा तब्बल २८ पृष्ठांचा शोधनिबंध प्रकाशित झाला आहे.

जैवतंत्रज्ञान अधिविभागात वीस वर्षांपासून औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया, शुद्धीकरण आणि त्याचे व्यवस्थापन विषयावर संशोधन सुरू आहे. विशेषतः वस्त्रोद्योग कारखान्यांमधून जी प्रदूषक रंगद्रव्ये सांडपाण्यात मिसळलेली असतात, त्यांच्यावर प्रक्रिया करून ते सांडपाणी नैसर्गिक पद्धतीने शुद्ध करण्याच्या दिशेने प्रा. ज्योती जाधव यांचे संशोधन केंद्रित आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली शुभम सुतार या संशोधक विद्यार्थ्याने जांभळाच्या पानांपासून बायोचार तयार केला. या निर्मितीपुरतेच मर्यादित न राहता बायोचारच्या शोषण (ॲडसॉर्पशन) क्षमतेमधील वृद्धीचे विश्लेषण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यातून 'पोअर कॉन्फ्लेशनचा सिद्धांत' साकारला.

बायोचारच्या शोषण क्षमतावाढीचे मापन सलगपणे करता यावे, यासाठी शुभम यांचा त्यांच्या सिद्धांताला गणितीय स्वरूप देण्याचा प्रयत्न यशस्वी झालेला असून, त्यांनी या गुरू-शिष्य जोडीच्याच नावाने 'शुभज्योत समीकरणा'चीही देणगी ॲडसॉर्पशन विज्ञान क्षेत्राला दिली आहे. या क्षेत्रात यापूर्वी स्युडो फर्स्ट ऑर्डर आणि स्युडो सेकंड ऑर्डर रिॲक्शन मॉडेल्स प्रचलित आहेत. नेमकी ही मर्यादा लक्षात घेऊन शुभम यांनी त्यामध्ये 'ट्रान्झिएन्ट ॲडसॉर्पशन कपॅसिटी' या संकल्पनेचा नव्याने समावेश केला आणि त्यावर आधारित शुभज्योत समीकरण मांडले. यापूर्वी संशोधन क्षेत्राला बायोचारच्या शोषण क्षमतेसंदर्भात माहिती होती; मात्र शुभज्योत समीकरणामुळे आता त्याची क्षमता संपृक्त बिंदूपर्यंत कमी होत जाते, हेही नव्याने सामोरे आले आहे.



कोल्हापूर : संशोधक डॉ. ज्योती जाधव आणि शुभम सुतार यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील.

### संशोधकांच्या प्रयत्नांचे फलित

प्रा. ज्योती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शुभम सुतार यांनी मांडलेला नवा सिद्धांत आणि समीकरण सातत्यपूर्ण संशोधनाचे फलित आहे. एखादा सिद्धांत किंवा समीकरण मांडणे आणि त्याचे जागतिक विज्ञान क्षेत्राकडून स्वागत होणे, या अत्यंत दुर्मीळ घटना असतात. त्यामध्ये या संशोधकांनी आता स्थान मिळवले आहे, याचा विद्यापीठ परिवाराला सार्थ अभिमान आहे.

**- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के**

### 'यशाचे श्रेय शिवाजी विद्यापीठाचे'

संशोधनाची विश्लेषण प्रक्रिया विद्यापीठामध्येच उपलब्ध शास्त्रीय उपकरणांवर करण्यात आली. विद्यापीठाने उपलब्ध केलेली सामग्री आणि कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह प्रशासकीय घटकांच्या पाठबळाच्या आधारावरच मोठी झेप घेता आली.

**- डॉ. ज्योती जाधव, ज्येष्ठ शास्त्रज्ञ**

### 'महाज्योती'ची साथ

मार्गदर्शक प्रा. जाधव यांनी संशोधन पुढे घेऊन जाण्यास सातत्याने प्रोत्साहित केले. त्यामुळेच सिद्धांत आणि समीकरण एकाच वेळी मांडता आले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या 'महाज्योती' शिष्यवृत्तीमुळे संशोधन करता आले.

**- शुभम सुतार, संशोधक विद्यार्थी**

24 JAN 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सांडपाणी पिण्यायोग्य करणारा स्पंज

## शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांचे संशोधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागाने सांडपाण्याचे शुद्धीकरण करणारा स्पंज शोधून काढला आहे. विद्यापीठातील ज्येष्ठ संशोधक डॉ. ज्योती जाधव आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी शुभम सुतार यांनी हे संशोधन केले.

औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया आणि शुद्धीकरण या जगाला भेडसावणाऱ्या समस्येच्या अनुषंगाने हे संशोधन करताना 'थिअरी ऑफ पोअर कॉन्फ्लेशन' या नव्या सिद्धांताची तसेच 'शुभज्योत इक्वेशन' या नव्या समीकरणाची भर पडली आहे.

शुभम सुतार या संशोधक विद्यार्थ्याने जांभळाच्या पानांपासून बायोचार तयार केला. बायोचारच्या शोषण क्षमतेमधील वृद्धीचे विश्लेषण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.


डॉ. ज्योती जाधव


शुभम सुतार

> या संशोधनाची विश्लेषण प्रक्रिया ही विद्यापीठाच्याच जैवतंत्रज्ञान अधिविभागासह विविध अधिविभाग आणि मध्यवर्ती सुविधा केंद्र येथे उपलब्ध शास्त्रीय उपकरणांवर करण्यात आली.
>
> **- डॉ. ज्योती जाधव,** ज्येष्ठ शास्त्रज्ञ, शिवाजी विद्यापीठ

### पोअर कॉन्फ्लेशनचा सिद्धांत

उच्च तापमानात बायोचारची शोषण क्षमता कशी वाढते, हे संशोधकांनी यात स्पष्ट केले. तापमानवाढीमुळे बायोचारमध्ये संरचनात्मक बदल होतात. त्याचा पृष्ठभाग आणि अंतर्गत क्षेत्र वाढते.

**यामुळे अंतिमतः त्याची सच्छिद्रता वाढून त्याच्या शोषण क्षमतेतही वाढ होते, असे हा सिद्धांत सांगतो.**



### 'बायोचार' हा सांडपाण्यातून रंग-प्रदूषके शोषून घेतो

१ निसर्गातील विविध सेंद्रिय घटकांचा वापर करून 'बायोचार' हा सांडपाण्यातून रंग-प्रदूषके शोषून घेणारा स्पंजसारखा सच्छिद्र पदार्थ निर्माण करणे आणि त्याची शोषण क्षमता वाढवत जाऊन संबंधित सांडपाण्याचे जास्तीत जास्त शुद्धीकरण करणे, अशी या संशोधनाची दिशा आहे.

२ याबाबतचा शोधनिबंध 'स्प्रिंजर नेचर' या आघाडीच्या नामांकित शोधपत्रिका समुहाच्या 'बायोचार' शोधपत्रिकेत विनामूल्य छापून आला आहे.

24 JAN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोळ्यांच्या रूपात पाणी घ्यावे लागेल

## डॉ. प्रमोद पाटील : एस. आर यादव, अनिलराज जगदाळे 'वसुंधरा गौरव'ने सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क




शिवाजी विद्यापीठ आणि किर्लोस्कर उद्योग समूहातर्फे आयोजित वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रा. डॉ. एस. आर. यादव, प्रा. डॉ. अनिलराज जगदाळे, प्रा. नागेश दप्तरदार, अमोल बुद्धे यांना वसुंधरा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**कोल्हापूर :** लोकसंख्या वाढ व नैसर्गिक संपत्ती यांचा मेळ घालणे गरजेचे असून प्रदूषण असेच होत राहिले तर आपल्या पुढच्या पिढीला गोळ्यांच्या रूपात पाणी घ्यावे लागेल, अशी भीती शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी गुरुवारी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठ व किर्लोस्कर उद्योग समूहातर्फे आयोजित वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना वसुंधरा सन्मान तर प्रा. डॉ. अनिलराज जगदाळे यांना वसुंधरा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. देवगड कॉलेजचे प्रा. नागेश दप्तरदार, अमोल बुद्धे यांना वसुंधरा मित्र व संपूर्ण अर्थ लाइव्हलिहूड फाउंडेशन यांना वसुंधरा मित्र पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, वेळ न घालवता शाश्वत विकासाकडे भर देणे गरजेचे आहे. यासाठी स्वतःमध्ये बदल घडवून आणा. किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाद्वारे पर्यावरणामध्ये काम करणाऱ्यांना मिळणारा पुरस्कार हा इतरांनाही प्रेरणा देतो. यावेळी फोटोग्राफी व रिल्स स्पर्धेमधील विजेत्यांना बक्षीस देण्यात आले. यावेळी किर्लोस्कर समूहाचे वीरेंद्र चित्राव, मकरंद जोशी, सुरेश मगदूम, हरीश सैवे व पर्यावरणशास्त्र विभागांच्या विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. पल्लवी भोसले, डॉ. रचना इंगवले उपस्थित होते. डॉ. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले. शरद आजगेकर यांनी आभार मानले.

27 JAN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भविष्यातील पिढ्यांसाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करा

## डॉ. पी. एस. पाटील : प्रा. डॉ. एस..आर. यादव, डॉ. अनिलराजे जगदाळे 'वसुंधरा' पुरस्कार प्रदान

### किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सव

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : वाढत्या औद्योगिकरणाच्या काळात प्रदूषण वाढते आहे. त्यामुळे भविष्यातील पिढ्यांना आपण काय देणार, हा प्रश्न गंभीर आहे. अशा काळात नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर योग्य प्रकार केला तर भविष्यातील पिढ्यांना आपण काहीतरी चांगले देऊ शकू, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

किर्लोस्कर कंपनी व शिवाजी विद्यापीठ आयोजित किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवाची आज सांगता झाली. यावेळी पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना वसुंधरा पुरस्काराने सन्मानीत केले. यावेळी ते बोलत होते.

वनस्पतीशास्त्राचे संशोधक प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना वसुंधरा सन्मान पुरस्कार, पर्यावरण संशोधन कार्याबद्दल डॉ. अनिलराजे जगदाळे वसुंधरा गौरव पुरस्कार, कासव संवर्धनाचे कार्य करणारे पर्यावरणीय अभ्यास डॉ. नागेश दसरदार व वनीकरणाचे कार्य करणारे अनमोल बुद्रे यांना वसुंधरा मित्र पुरस्कार तर कचरा व्यवस्थापन करणारी संपूर्ण अर्थ लाइव्हली हूड संस्थेला वसुंधरा ऑर्गनायझेशन पुरस्कार देण्यात आला.




कोल्हापूर : किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवात गुरूवारी पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना वसुंधरा पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. प्रा. डॉ. एस. आर. यादव, डॉ. नागेश दसरदार, अमोल बुद्रे, लाइव्हली हुड फाउंडेशनचे पदाधिकारी, शरद आजगेकर, सुरेश मगदूम, मकरंद जोशी, डॉ. पी. एस. पाटील, वीरेंद्र चित्राव, डॉ. असावरी जाधव, डॉ. रसिया पडळकर आदी उपस्थित होते.

स्मृतिचिन्ह, मानपत्र पुरस्काराचे स्वरूप होते. महोत्सव संचालक वीरेंद्र चित्राव प्रमुख उपस्थित होते.

डॉ. यादव म्हणाले, 'कोणतेही कार्य एकटा माणूस करू शकत नाही. त्याच्या कार्याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अनेकांचा हातभार असतो. माझ्या कार्याला अनेकांचे सहकार्य असल्याने या पुरस्कारात त्यांचाही सहभाग तितकाच आहे.'

डॉ. जगदाळे म्हणाले की, 'फॉर्मल एज्युकेशनपेक्षा इनफॉर्मल एज्युकेशनमधून जास्त चांगले शिकता येते, त्याची प्रचिती वसुंधरा महोत्सवात झालेल्या चर्चेतून दिसून येते.'

डॉ. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. असावरी जाधव यांनी महोत्सवाचा आढावा घेतला.

### 'नवीन पिढी पर्यावरण हानीच्या विरोधात'

■ वनस्पतीशास्त्रात पंचमहाभूत महत्त्वाची आहेत. माणूस उपाशी राहू शकत नाही, त्यासाठी अन्न महत्त्वाचे असते. जगासाठी अन्न तयार करणारा एकच शास्त्रज्ञ आहे तो म्हणजे वनस्पती. वनस्पती हेच अन्न तयार करतात, तसेच औषध तयार करतात. कोणतीही वनस्पती मानवासाठी दैवीशक्ती समान आहे. पश्चिम घाटातील अनेक उपयुक्त वनस्पतींबाबत अनेक पर्यावरणप्रेमींनी जागृती केली. त्यामुळे नवी पिढी पर्यावरणाला होणाऱ्या हानीच्या विरोधात असल्याचे दिसते. हे या पर्यावरण चळवळीचे फलित आहे, असेही डॉ. यादव यांनी सांगितले.

24 JAN 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मनानं चालणं ही यात्रा आणि हृदयानं चालणं ही वारी

## ■ प्र. कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील



**मिरज : केंब्रिज स्कूलसच्या शिल्पकार स्व. संयोगिता पृथ्वीराज पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करताना मान्यवर.**

**मिरज / प्रतिनिधी**

पृथ्वीराज पाटील यांनी तीन दशकं खस्ता खाल्ल्या, अनेक चढउतार अनुभवले आणि अथक परिश्रमाने गुलाबराव पाटील शैक्षणिक संकुल नावारूपाला आणले आहे. त्यांची ३३ वर्षाची तपश्चर्या फळास आली. पायी चालणं हा प्रवास, मनानं चालणं ही यात्रा आणि हृदयानं चालणं ही वारी असते. पृथ्वीराजबाबा पाटील यांनी बहुजन शिक्षणाची वारी करुन ज्ञानदानाचे पवित्र कार्य हाती घेतले. यामधून हजारो विद्यार्थी घडले. या त्यांच्या कार्यात स्व. संयोगिता पाटील यांचे योगदान मोलाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

जीपीएमटीच्या केंब्रिज स्कूलसच्या शिल्पकार स्व. संयोगिता पृथ्वीराज पाटील यांचा स्मृतीदिन व त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिले जाणाऱ्या आदर्श शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक चेअरमन पृथ्वीराज पाटील होते. केंब्रिज स्कूलसच्या शिल्पकार संयोगिता पाटील यांच्या स्मरणार्थ संस्थेच्या वतीने २०२३-२४ व सन २०२४ - २५ या वर्षाचे स्व. संयोगिता पृथ्वीराज पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मनिषा लेले, संध्याराणी कांबळे, मंदाकिनी जगताप व सना जमादार यांना डॉ. प्रमोद एस. पाटील व पृथ्वीराज पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षातील श्रीमती जयमाला जयसिंगराव पवार पुरस्कृत स्व. संयोगिता पृथ्वीराज पाटील आदर्श सेवक पुरस्कार त्यांच्या हस्ते प्रमिला मसराज व अमोल जाधव यांना प्रदान करण्यात आला. प्राचार्य साहेबलाल शरीकमसलत यांनी स्वागत प्रास्ताविकात संयोगिता पाटील यांच्या योगदानाचा उल्लेख केला. प्रा. एन. डी. बिरनाळे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन प्राचार्य श्रीदेवी कुळ्ळोळी यांनी केले. आभार प्राचार्या ख्रिस्तिना मार्टिन यांनी मानले. यावेळी संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती प्रमिलादेवी गुलाबराव पाटील, विश्वस्त सर्वश्री ॲड. विरेंद्र पाटील, शंकर तावदारे, डॉ. इक्बाल तांबोळी, समन्वयक प्राचार्य सतीश पाटील, डॉ. प्रा. प्रकाश कदम, सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

24 JAN 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आपत्ती व्यवस्थापनातील शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, अधिकाऱ्यांना पाठबळ द्या

## खा. शरद पवार; व्हाईट आर्मीतर्फे आपत्ती व्यवस्थापन योद्धा पुरस्कार प्रदान सोहळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आपत्तीच्या काळात महाराष्ट्रातील शासकीय यंत्रणा, अधिकारी व स्वयंसेवी संस्था उत्कृष्ट काम करतात. याचा अनुभव प्रत्येक संकटाच्या वेळी आला आहे. त्यामुळे अशा काळात काम करणाऱ्या शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, अधिकारी यांना नागरिकांनी पाठबळ दिले, तर कोणत्याही संकटांवर मात करू शकतो, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खा. शरद पवार यांनी गुरुवारी व्यक्त केला.

व्हाईट आर्मी, शिवाजी विद्यापीठ शिव-सहाय्यता आपत्ती व्यवस्थापन केंद्र, एनएसएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा पुरस्कार सोहळा विद्यापीठातील राजमाता जिजाऊ माँसाहेब सभागृहात गुरुवारी सायंकाळी झाला. यात्रसंगी खा. शरद पवार यांना आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा पुरस्कार खा. शाहू महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी अमोल येडगे, समरजित घाटगे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष व्ही. बी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी खा. पवार यांनी लातूर, भूज, कच्छमधील भूकंप, मुंबईचा बॉम्बस्फोटावेळी शासकीय यंत्रणा व इतर गोष्टी हाताळताना आलेले अनुभव कथन केले. देशामध्ये अनेक प्रकारची संकटे येतात. महाराष्ट्रात काम करताना पान ७ वर ▸




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात व्हाईट आर्मीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात खा. शरद पवार यांना आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा पुरस्कार प्रदान करताना खा. शाहू महाराज, अशोक रोकडे. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. जिल्हाधिकारी अमोल येडगे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, समरजित घाटगे, व्ही. बी. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : मिलन मकानदार)

### दै. 'पुढारी' रिलीफ फंडच्या कार्याचा गौरव

दै. 'पुढारी'ने देश, राज्य आणि विविध जिल्ह्यांत आलेल्या आपत्तीच्या वेळी महत्त्वाची भूमिका बजावली. लातूर, गुजरातमधील भूज, कच्छचा भूकंप यासह कोल्हापूर, सांगली, सातारा येथील महापुरात लोकांना जीवनावश्यक साहित्यासह विविध गोष्टींची मदत केली. अनेकांचे संसार नव्याने उभारले. आपत्ती व्यवस्थापनातील याच कार्याची दखल घेऊन व्हाईट आर्मीच्या वतीने दै. 'पुढारी' रिलीफ फंड कार्याला आपत्ती व्यवस्थापन योद्धा पुरस्काराने गौरविण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2025
Times of India

# NGO felicitates Sharad Pawar for disaster management efforts

Rahul.Gayakwad
@timesofindia.com

**Kolhapur:** NCP (SP) party chief Sharad Pawar was honoured with the 'Apatti Vyavasthapan Mahayoddha' award on behalf of White Army, a disaster management NGO, at an event held at Shivaji University premises on Thursday.

Speaking on the occasion, Pawar discussed how he immediately went to calamity-hit areas like the earthquake in Latur, bomb blasts and Mumbai and how the administrative system was put to work. He asserted that many organisations also work in such cases and it is our responsibility to strengthen such organisations.

Addressing the audience, Pawar said, "When I was working in Mantralaya one day, I heard a loud noise like a bomb blast. I enquired at the Air India office nearby. Byt then, 10 to 11 bomb blasts took place. With the help of Akashwani radio and All India Radio, I appealed to citizens that Mumbai was under attack. I informed them of the correct bomb blast locations. Within 24 hours, Mumbai was back on track. Then I started the Bombay stock market, conveying the message everywhere that Mumbai had returned to normalcy."

Meanwhile, MP Shahu Chhatrapati said, "The work done by MP Sharad Pawar in many calamities, including earthquakes and bomb blasts, is very good. At that time, taking the right decision, Pawar provided relief and made the system work. So this award has been given to a very deserving person."

Founder of White Army Ashok Rokade, collector Amol Yedge, vice-chancellor Dr D. T. Shirke, pro-vice chancellor Dr Pramod Patil and other dignitaries were present at the occasion.

Rahul Gayakwad



Sharad Pawar being honoured with 'Mahayoddha' award

24 JAN 2025 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आपत्ती व्यवस्थापनात कार्यरत शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, अधिकाऱ्यांना पाठबळ द्या

(पान १ वरून)

अनेक आपत्तींचा सामना करावा लागला आहे. लातूरच्या भूकंपात सकाळी पोहोचलो तेव्हा अनेक घरे पडली होती, जनजीवन विस्कळीत झाले होते. अशा परिस्थितीत मी सोलापूरला माझे कार्यालय थाटून प्रशासकीय यंत्रणेशी संवाद साधत तेथील परिस्थिती हाताळली. भूकंपावेळी शासकीय अधिकाऱ्यांनी, काही स्वयंसेवी संस्थांनी उत्कृष्ट काम केले. आपत्तीच्या काळात महाराष्ट्रातील शासकीय यंत्रणा चांगले काम करते, असा अनुभव आहे. त्यामुळे त्यांना नागरिकांनी सहकार्य करणे गरजेचे आहे.

खा. शाहू महाराज म्हणाले, आपत्ती व्यवस्थापन योद्धा पुरस्काराने खा. शरद पवार यांचा सन्मान योग्य व्यक्तीचा सन्मान आहे. लातूर येथील भूकंपाच्यावेळी ते पोहोचले. त्यांनी गतिमान पद्धतीने शासकीय यंत्रणा कार्यरत केली. यामुळेच लोकांना योग्यवेळी मदत पोहोचली, अनेकांचे जीव वाचले. भूज येथील भूकंपावेळी यशस्वीपणे त्यांनी महाराष्ट्र पॅटर्न वापरून सर्वसामान्यांना दिलासा देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. मुंबई बॉम्बस्फोटात खा. पवार धावून गेल्याने वातावरण शांत झाल्याचे गौरवोद्गार खा. शाहू महाराज यांनी काढले.

## भारतात पहिल्यांदा आपत्ती व्यवस्थापन कायदा झाला

कच्छ, भूज भूकंपावेळी अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान होते. त्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलवून यातून मार्ग काढण्याची विनंती केली. यावेळी सर्वांनीच माझे नाव पुढे केल्याने भूकंपावेळी मी आपत्ती व्यवस्थापनात पुढाकार घेतला. केंद्रीय मंत्री असताना मी व तत्कालीन सचिव पी. के. मिश्रा यांनी जपान, कॅलिफोर्नियासह तीन-चार देशांचा दौरा केला. तेथील आपत्ती व्यवस्थापनाच्या यंत्रणा पाहिल्या त्यांचा अभ्यास केला. अन् त्यातूनच भारतात पहिल्यांदा आपत्ती व्यवस्थापन कायदा तयार झाल्याची आठवण खा. पवार यांनी सांगितली.

व्हाईट आर्मीचे संस्थापक अशोक रोकडे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या २५ वर्षांच्या कामगिरीचा आढावा घेतला. शालेय अभ्यासक्रमात आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रमाचा समावेश करावा. तसेच कोल्हापुरात आपत्ती व्यवस्थापनसंदर्भातील विद्यापीठ व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन व मानपत्राचे वाचन केले. अमोल कोडोलीकर यांनी आभार मानले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सरोजमाई पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रयत शिक्षण संस्था मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य डॉ. एम. बी. शेख, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष आर. के. पोवार, अनिल घाटगे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

राज्याचे माजी निवृत्त प्रधान सचिव उमेशचंद्र सारंगी, निवृत्त उपसचिव दत्तात्रय मेतके, बृहमुंबई महापालिकेचे निवृत्त विशेष कार्यकारी अधिकारी सुभाष दळवी, बृहमुंबई महापालिका अग्निशन दलाचे सर्जेराव बनकर यांचा उपमुख्यमंत्री कार्यालयाचे खासगी सचिव नंदकुमार काटकर, कोल्हापूर हॉटेल मालक संघाचे आनंद माने, पाटीदार समाज यांचा व्हाईट आर्मीच्या वतीने 'आपत्ती व्यवस्थापन योद्धा' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

**नरसिंहराव यांना सांगितले तुम्ही लातूरला येऊ नका**

लातूर भूकंपावेळी तत्कालीन पंतप्रधान पी. नरसिंहराव परिस्थितीची पाहणी करण्यासाठी लातूरला येणार होते. मात्र, ते आले तर सर्व यंत्रणा त्यांच्यामागे ठेवावी लागेल. परिणामी, आपत्ती व्यवस्थापन विस्कळीत होईल. त्यामुळे तुम्ही लातूरला येऊ नका, अशी विनंती मी त्यांना केली. त्यांनीही मोठ्या मनाने ती स्वीकारल्याची आठवण पवार यांनी सांगितली.

**खा. पवार यांचे अर्धा तास भाषण**

खा. शरद पवार यांची प्रकृती सकाळपासून खराब असतानाही त्यांचे दिवसभर महाराष्ट्रात दौरे सुरू होते. कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमावेळी त्यांचा घसा प्रचंड दुखत असतानाही त्यांनी उभे राहून २५ ते ३० मिनिटे भाषण केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2025
पुण्यनगरी



कोल्हापूर : खा. शरद पवार यांना 'आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा' पुरस्काराने गौरविताना करताना खा. शाहू छत्रपती. (छाया : पांडुरंग पाटील)

# आपत्ती काळात काम करणाऱ्यांच्या पाठीशी राहा

## शरद पवार; व्हाईट आर्मीतर्फे पवार यांचा 'आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा' म्हणून गौरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विविध आपत्तींच्या काळात शासकीय यंत्रणेसह व्हाईट आर्मीसारख्या सेवाभावी संस्था झोकून देऊन काम करत असतात. अशांच्या पाठीशी उभे राहा, असे आवाहन खा. शरद पवार यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृहात व्हाईट आर्मीतर्फे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी शरद पवार यांनी केलेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्याबद्दल त्यांना 'आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा' या पुरस्काराने खा. श्रीमंत शाहू महाराज यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यक्ती तसेच संस्थांना आपत्ती व्यवस्थापन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

खा. पवार म्हणाले, प्रत्येक आपत्तीशी धैर्याने मुकाबला करावा लागतो. शासकीय यंत्रणा दिवस-रात्र या काळात काम करत असतात; मात्र देशात आपत्तीप्रसंगी राबवण्याची धोरणे तसेच किंवा कायदा नव्हता. या बाबतचा अभ्यास करून कायदा तयार करण्याची जबाबदारी माझ्यावर आली. जगभरातील इतर देशांमधील माहिती घेऊन आपत्ती व्यवस्थापनाचा कायदा तयार करण्यात आला. सध्या याच आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा वापर देशभरात केला जातो.

यावेळी खा. शाहू महाराज म्हणाले, व्हाईट आर्मीने पुरस्कारांसाठी योग्य व्यक्तीची निवड केली आहे. अनेक आपत्तींवेळी शरद पवार यांनी सर्वात पहिल्यांदा तेथे पोहोचून विविध स्तरांवर मदत पोहोचविली. कार्यक्रमास समरजितसिंग घाटगे, व्ही. बी. पाटील, जिल्हाधिकारी अमोल येडगे, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सरोज पाटील, आर. के. पोवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन पंडित कंदले यांनी केले.

22 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरण रक्षणात विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा

## पर्यावरणतज्ज्ञ राजेंद्र शेंडे यांचे आवाहन : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला प्रारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २१ : 'प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना धोरणात्मक पातळीवरच्या आणि मूलभूत असाव्यात. त्याबरोबरच या उपाययोजनांच्या अंमलबजावणीत लोकसहभाग महत्त्वाचा आहे. त्यादृष्टीने प्रबोधन, संशोधनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणात पुढाकार घ्यावा', असे आवाहन पर्यावरणतज्ज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे यांनी आज येथे केले.**




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन पर्यावरणतज्ज्ञ राजेंद्र शेंडे आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून वीरेंद्र गायकवाड, सुरेश मगदूम, मकरंद जोशी, आर. आर. देशपांडे, वीरेंद्र चित्राव, आसावरी जाधव, शरद आजगेकर उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, महोत्सवाचे अध्यक्ष आर. आर. देशपांडे, संचालक वीरेंद्र चित्राव प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शेंडे म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांनी शाश्वत विकासाची संकल्पना प्रभावीपणे राबविली. त्यात गडावरील पाणी व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, वृक्षसंवर्धन, आदींचा समावेश होता. शिवरायांच्या नावाने असलेल्या विद्यापीठात पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारा वसुंधरा महोत्सव होत असल्याचा आनंद वाटत आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाला चालना मिळणार आहे. देशातील सर्व विद्यापीठांनी एक संयुक्त प्लॅटफॉर्म तयार करून त्याद्वारे संशोधन, संशोधनातून पर्यावरण संवर्धनाला बळ द्यावे.'

'पर्यावरण रक्षण काळाची गरज आहे. त्यादृष्टीने पुढच्या पिढीसाठी आपण काहीतरी करायला हवे, असा महत्त्वपूर्ण संदेश या महोत्सवातून दिला जात आहे. त्याबाबतचा किर्लोस्कर समूहाचा उपक्रम कौतुकास्पद आहे. युवा पिढीसह समाजाला पर्यावरण संवर्धनाची जाणीव करून देण्याचे काम विद्यापीठ करत असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

महोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते रोपाला पाणी घालून करण्यात आले. पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. देशपांडे आणि चित्राव यांनी महोत्सव आयोजनाची भूमिका मांडली. किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेडचे [illegible] सिंग यांनी कंपनीच्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. यावेळी मकरंद जोशी, सुरेश मगदूम, वीरेंद्र गायकवाड, हरीश मैंद, आदी उपस्थित होते. शरद आजगेकर यांनी सूत्रसंचालन केले.

दरम्यान, उद्घाटनानंतर 'कचरा व्यवस्थापन' या विषयावर चर्चासत्र झाले. त्यात प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी प्रमोद माने, पर्यावरणतज्ज्ञ [illegible] 'संतुलन' फाउंडेशनच्या [illegible] जोशी, तेजस्वी कुमार यांनी [illegible] मांडले.

### निसर्गायन रंगले...

■ महोत्सवात हवामान बदलाच्या आव्हानांचा वेध घेणाऱ्या 'धोका', आदी विभागातील चित्रपटांचे सादरीकरण झाले. त्यानंतर सायंकाळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या निसर्गविषयक काव्य वाचनाचा 'निसर्गायन' कार्यक्रम झाला. त्यात श्रीराम मोहिते, रसिका पडळकर, आदी सहभागी झाले.

### महोत्सवात आज

■ सकाळी साडेआठ वाजता पर्यावरणप्रेमींचे विद्यार्थी 'किर्लोस्कर' कंपनीला भेट देतील. दुपारी अडीच वाजता 'स्मार्ट शहराच्या दिशेने वाटचाल' या विषयावर चर्चासत्र होईल. त्यात आर्किटेक्ट शिरीष बेरी, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, डॉ. शुभलक्ष्मी [illegible] सहभागी होणार आहेत. त्यानंतर पर्यावरणविषयक चित्रपटांचे सादरीकरण होणार आहे.

24 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आपत्ती काळात सेवा देणाऱ्या संस्थांना मदत द्या

## राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे आवाहन : आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा पुरस्काराने पवार यांचा सन्मान

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशात आणि राज्यात अनेकवेळा आपत्ती आल्या आहेत. या काळात प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून मदत करण्याचे काम केले आहे. अशा संस्थांना आता मदत करण्याची जबाबदारी आपली आहे. नागरीक म्हणून या संस्थांना मदतीचा हात देवूया असे आवाहन राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी केले.

ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी महाराष्ट्रासह संपूर्ण देशात आपत्ती काळात राबविलेल्या बचावकार्याबद्दल जीवन मुक्ती सेवा संस्था, व्हाईट आर्मी यांच्यावतीने आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि मानपत्र देवून शरद पवार यांचा सत्कार करण्यात




कोल्हापूर : ज्येष्ठ नेते शरद पवार यांना गुरुवारी खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, व्हाईट आर्मीचे अशोक रोकडे, समरजित घाटगे आदी.

आला. शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाउसाहेब सभागृहामध्ये हा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, शाहू कारखान्याचे अध्यक्ष समरजित घाटगे, सरोज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु पी. एस. पाटील, रजिस्टार डॉ. व्ही. एन. शिंदे, व्हाईट आर्मीचे अशोक रोकडे, राष्ट्रवादीचे व्ही. बी. पाटील प्रमुख उपस्थित होते. शरद पवार म्हणाले, देशासह राज्यावर आजपर्यंत अनेकवेळा आपत्ती आल्या. यामध्ये प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून बचावकार्य राबविण्याचे काम अनेक सेवाभावी संस्थांनी केले. तिलारी येथे भूकंप झाला त्यावेळी सकाळी ७ वाजता मी घटनास्थळावर पोहोचलो होतो. भूकंप झाल्यानंतर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा २४ तास राबत होती. . याकाळात प्रशासनाने राबविलेली बचावकार्य आणि त्यानंतर तेथील जनजीवन पुर्वपदावर आणण्यासाठी यंत्रणेने अहोरात्र कष्ट केले. तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंगराव यांचा मला फोन आला होता. मी तेथे [illegible], मात्र मी त्यांना स्पष्ट शब्दात [illegible] नका असे सांगितले.माझ्यासोबत पी. के. मिश्रा नावाचे अधिकारी होते त्यांनी आपत्ती व्यवस्थापन [illegible] झाला पाहिजे असे सांगितले. [illegible] देशात आपत्ती व्यवस्थापन [illegible] अस्तित्वात आला.

मुंबई बॉम्बस्फोटामध्ये ११ ठिकाणी स्फोट घडले असतानाही महंमद अली रोडवर बॉम्बस्फोट झाल्याचे सांगितले यामुळे अवघ्या ४८ तासांमध्ये मुंबई शांत झाली असल्याचे अनुभव सांगितले. खासदार शाहू महाराज म्हणाले,आपत्तीवेळी शरद पवार यांनी बचाव कार्यामध्ये सहभागी होवून प्रशासनाकडून योग्य पद्धतीने काम करून घेतले.

### यांना मिळाले पुरस्कार

निवृत्त प्रधान सचिव उमेशचंद्र सारंगी, निवृत्त उपसचिव दत्तात्रय मेतके,मुंबई अग्नीशमन दलाचे निवृत्त अधिकारी हेमंत परब, बृहन्मुंबई महापालिकेचे निवृत्त अधिकारी सुभाष [illegible], आर.डी.पाटील [illegible], कोल्हापूर हॉटेल मालक संघ, [illegible] समाज.

### [illegible]

[illegible] नेते शरद पवार यांच्या घशाला [illegible] झाली आहे. [illegible] वारंवार त्यांना त्रास होत होता. मात्र या स्थितीमध्येही त्यांनी २४ मिनीटे उभारून भाषण केले. यानंतर मात्र त्यांनी घशाला त्रास होत असल्यामुळे भाषण थांबवत असल्याचे सांगितले.

# आपत्ती निवारणासाठी सतर्क राहणे गरजेचे - पवार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



व्हाइट आर्मी संस्थेच्या वतीने शरद पवार यांना शाहू महाराज यांच्या हस्ते महायोद्धा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**कोल्हापूर :** आपत्ती सांगून येत नसते. अशा वेळी शासकीय यंत्रणेने सतर्क राहणे गरजेचे असते. आपत्ती निराकरणासाठी कामाला वाहून घेण्याची वृत्ती असली पाहिजे. माझ्याकडे ज्यावेळी अशाप्रकारची जबाबदारी आली तेव्हा हे काम पूर्ण क्षमतेने करता आले याचे समाधान आहे, असे मत माजी केंद्रीय संरक्षण मंत्री शरद पवार यांनी गुरुवारी येथे व्यक्त केले.

आपत्ती निवारण क्षेत्रात कार्य करणाऱ्या येथील व्हाईट आर्मी या संस्थेच्या वतीने शरद पवार यांनी आपत्ती क्षेत्रात केलेल्या कार्याचा सन्मान म्हणून महायोद्धा हा पुरस्कार खासदार शाहू महाराज छत्रपती यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पवार बोलत होते.

त्यांनी आपल्या कारकीर्दीत किल्लारी भूकंप, गुजरात मधील भूकंप या महत्त्वाच्या आपत्ती प्रसंगी केलेल्या कार्याची आठवण करून दिली. ते म्हणाले, की किल्लारीत भूकंप झाल्यानंतर दिल्लीहून महाराष्ट्रात येवून तेथील जनजीवन सुरळीत करण्याचा प्रयत्न करतानाच योग्य पद्धतीचे पुनर्वसन केले. गुजरातमध्ये भूकंप झाला तेव्हा तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी सर्व पक्षांची बैठक बोलावली होती. तेव्हा आपत्ती निवारणाची जबाबदारी सोपवल्यानंतर तेथेही अल्पकाळात चांगले काम करता आले याचे समाधान आहे. आपत्तीच्या प्रसंगी काम करणाऱ्या व्हाईट आर्मी सारख्या संस्था आणि स्वयंसेवकांना संकट दूर करण्याच्या कामी आपण सर्वांनी सहकार्य करूया, असे आवाहन त्यांनी केले.

अशोक रोकडे यांनी प्रास्ताविकात व्हाईट आर्मीच्या कार्याचा आढावा घेतला. उमेशचंद्र सारंगी, दत्तात्रय मेतके, कोल्हापूर हॉटेल मालक संघाचे आर. डी. पाटील, पाटीदार समाज यांना शरद पवार यांच्या हस्ते आपत्ती व्यवस्थापन युद्ध पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, समरजित घाटगे, व्ही. बी. पाटील, कुलगुरू डॉ. डी. एन. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2025
लोकमत

# विद्यापीठात नेताजी बोस, बाळासाहेब ठाकरे यांची जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आझाद हिंद सेनेचे संस्थापक, स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती गुरुवारी शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.


यावेळी कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव कर्मचारी, अधिकारी, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2025
सकाळ

# विद्यापीठात अभिवादन कार्यक्रम

**कोल्हापूर :** नेताजी सुभाषचंद्र बोस आणि शिवसेनेचे संस्थापक पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आज विद्यापीठात अभिवादन कार्यक्रम झाला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. तानाजी चौगुले, सागर डेळेकर, रामचंद्र पवार, शरद बनसोडे, प्रमोद पांडव, के. वाय. राजपुरे, अण्णासाहेब मोहोळकर, मानसिंग टाकळे, राजीव व्हटकर, कविता ओझा, उर्मिला पोळ आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2025
तरुण भारत



कोल्हापूर : डॉ. घनश्याम जाधव यांचा सत्कार करताना डॉ. राजेंद्र सोनकवडे

# 'मानवी प्रगतीसाठी विज्ञानाची जोड आवश्यक'

**कोल्हापूर :** मुलभूत विज्ञानामुळे मानवाच्या प्रगतीचा वेग वाढत असून मानवी प्रगतीसाठी विज्ञानाची जोड आवश्यक असल्याचे प्रतिपादन छत्रपती शिवाजी महाविद्यालयचे प्रा. डॉ. घनश्याम जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात आयोजित "अणूची रचना" या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. प्रा. सोनकवडे होते. प्रा. सोनकवडे म्हणाले, भारतीय शिक्षण पद्धती आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांमध्ये सामर्थ्य असून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. क्वांटम सायन्समुळे झालेल्या प्रगतीस यंदा १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे भारतीय संशोधकांनी २०२५ हे वर्ष क्वांटम सायन्स वर्ष म्हणून साजरे करावे, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. एस. एस. पाटील यांनी प्रास्ताविक व परिचय करून दिला. डॉ. सोनकवडे यांच्या हस्ते डॉ. जाधव यांचा सत्कार करण्यात आला. साक्षी काळे व साधना परीट यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. आर. वाईकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. केशव राजपुरे, डॉ. राजीव व्हटकर, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ.आण्णासाहेब मोहोळकर, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. दास, डॉ. पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JAN 2025

लोकमत

# विद्यापीठाची वेबसाइट हॅक करण्याचा प्रयत्न फसला

## प्रशासनाकडून दखल; फायर वॉलमुळे धोका टळला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ (वेबसाइट) हॅक करण्याचा प्रयत्न गुरुवारी दुपारी झाला. फायर वॉलमुळे हॅकर्सचा प्रयत्न फसला. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी तत्काळ दखल घेत सुरक्षेचे आढावा घेतला.

विद्यापीठाची वेबसाइट गेल्या काही महिन्यांपूर्वी हॅक करून त्यावरील वॉटरमार्कसह इतर गोष्टींचा वापर करण्याचा प्रयत्न झाला होता. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन वेबसाइटच्या सुरक्षेसाठी चोख उपाययोजना केल्या. मात्र, गुरुवारी पुन्हा विद्यापीठाची वेबसाइट हॅक करण्याचा प्रयत्न हॅकर्सने केला. गुगल सर्च इंजिनद्वारे शिवाजी विद्यापीठाची वेबसाइट शोधणाऱ्या व्यक्तींना 'ही साइट हॅक झाली असण्याची शक्यता आहे,' अशा स्वरूपाचा संदेश दुपारपासून दिसत होता. बिंग, डकडकगो आदी अन्य सर्च इंजिनवर असा संदेश दिसत नव्हता.

तरीही खबरदारीचा उपाय म्हणून संगणक केंद्रामार्फत फायरवॉल सुरक्षेची तपासणी केली असता काही पृष्ठे हॅक करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2025
सकाळ

# विद्यापीठाची 'वेबसाईट हॅक' करण्याचा प्रयत्न असफल

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाची वेबसाईट हॅक करण्याचा आज झालेला प्रयत्न फायरवॉलमुळे असफल ठरला. विद्यापीठाची वेबसाईट सुरक्षित आहे, असे संगणक केंद्राचे संचालक अभिजित रेडेकर यांनी कळविले आहे.

गुगल सर्च इंजिनद्वारे विद्यापीठाची वेबसाईट शोधणाऱ्या व्यक्तींना 'ही साईट हॅक झाली असण्याची शक्यता आहे,' अशा स्वरूपाचा संदेश आज दुपारपासून दिसत होता. बिंग, डकडकगो, आदी अन्य सर्च इंजिनवर असा संदेश दिसत नव्हता. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून संगणक केंद्रामार्फत फायरवॉल सुरक्षेची तपासणी केली असता काही पृष्ठे हॅक करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसले. या पृष्ठांबाबत खबरदारी घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे गुगल सर्च इंजिनला ही बाब कळविली आहे. अशा प्रकारे हॅकिंग करण्याचे प्रयत्न जगभरातील हॅकर्सकडून सातत्याने होत असतात. त्यांचे विद्यापीठ संगणक केंद्राकडून मॉनिटरिंग होत असते आणि फायरवॉलद्वारे ते हल्ले परतवूनही लावले जात असतात. त्यातूनही एखादे पृष्ठ प्रभावित झाल्यास अशा प्रकारचा संदेश दिसण्याची शक्यता असते, असे रेडेकर यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची वेबसाईट हॅक करण्याचा प्रयत्न

## फायर वॉलमुळे हॅकर्सचा प्रयत्न फसला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ (वेबसाईट) हॅक करण्याचा प्रयत्न गुरुवारी दुपारी झाला. फायर वॉलमुळे हॅकर्सचा प्रयत्न फसला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी तत्काळ दखल घेत सुरक्षेसंबंधीचा आढावा घेतला.

विद्यापीठाची वेबसाईट गेल्या काही महिन्यांपूर्वी हॅक करून त्यावरील वॉटरमार्कसह इतर गोष्टींचा वापर करण्याचा प्रयत्न झाला होता. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन वेबसाईटची सुरक्षेसाठी चोख उपाययोजना केल्या होत्या. त्यानंतर दि. २३ रोजी पुन्हा विद्यापीठाची वेबसाईट हॅक करण्याचा प्रयत्न हॅकर्स झाला.

गुगल सर्च इंजिनद्वारे शिवाजी विद्यापीठाची वेबसाईट शोधणाऱ्या व्यक्तींना ही साईट हॅक झाली असण्याची शक्यता आहे, अशा स्वरुपाचा संदेश दुपारपासून दिसत होता. बिंग, डकडकगो आदी अन्य सर्च इंजिनवर असा संदेश दिसत नव्हता. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून संगणक केंद्रामार्फत फायरवॉल सुरक्षेची तपासणी केली असता काही पृष्ठे हॅक करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून आले. या पृष्ठांबाबत खबरदारी घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे गुगल सर्च इंजिनला सदर बाब कळविण्यात आली आहे. वेबसाईट हॅक करण्याचा झालेला प्रयत्न फायरवॉलमुळे असफल ठरला. विद्यापीठाची वेबसाईट सुरक्षित आहे, असे संगणक केंद्राचे संचालक अभिजीत रेडेकर यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2025

पुण्यनगरी

# विद्यापीठाची वेबसाईट हॅकचा असफल प्रयत्न

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची वेबसाईट हॅक करण्याचा प्रयत्न शुक्रवारी झाला; मात्र फायरवॉलमुळे हा प्रयत्न असफल ठरला. हॅक करण्याचा प्रयत्न झाला असला तरी विद्यापीठाची वेबसाईट सुरक्षित आहे, असे संगणक केंद्राचे संचालक अभिजित रेडेकर यांच्याकडून सांगण्यात आले.

गुगल सर्च इंजिनद्वारे शिवाजी विद्यापीठाची वेबसाईट शोधणाऱ्या व्यक्तींना 'ही साईट हॅक झाली असण्याची शक्यता आहे,' अशा स्वरूपाचा संदेश शुक्रवारी दुपारपासून दिसत होता. बिंग, डकडकगो आदी अन्य सर्च इंजिनवर असा संदेश दिसत नव्हता. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून संगणक केंद्रामार्फत फायरवॉल सुरक्षेची तपासणी केली असता काही पृष्ठे हॅक करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून आले.

विद्यापीठ प्रशासनाकडून या पृष्ठांबाबत खबरदारी घेण्यात आली. त्याचप्रमाणे गुगल सर्च इंजिनला हा प्रकार कळवण्यात आला. अशाप्रकारे हॅकिंग करण्याचे प्रयत्न जगभरातील हॅकर्सकडून सातत्याने होत असतात. त्यांचे विद्यापीठ संगणक केंद्राकडून मॉनिटरिंग होत असते आणि फायरवॉलद्वारे ते हल्ले परतावूनही लावले जात असतात. त्यातूनही एखादे पृष्ठ प्रभावित झाल्यास अशा प्रकारचा संदेश दिसण्याची शक्यता असते, असेही रेडेकर यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाची वेबसाईट सुरक्षित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाची वेबसाईट हॅक करण्याचा गुरूवारी झालेला प्रयत्न फायरवॉलमुळे



असफल ठरला आहे. विद्यापीठाची वेबसाईट सुरक्षित आहे, असे संगणक केंद्राचे संचालक अभिजीत रेडेकर यांनी सांगितले. गुगल सर्च इंजिनद्वारे शिवाजी विद्यापीठाची वेबसाईट शोधण्याच्या प्रयत्न झाला असून काही व्यक्तींना 'ही साईट हॅक झाली असण्याची शक्यता आहे" असा संदेश गुरूवारी दुपारपासून दिसत होता. बिंग, डकडकगो आदी अन्य सर्च इंजिनवर असा संदेश दिसत नव्हता. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून संगणक केंद्रामार्फत फायरवॉल सुरक्षेची तपासणी केली असता काही पृष्ठ हॅक करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून आले. सदर पृष्ठांबाबत खबरदारी घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे गुगल सर्च इंजिनला सदर बाब कळविण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. अशा प्रकारे हॅकिंग करण्याचे प्रयत्न जगभरातील हॅकर्सकडून सातत्याने होत असतात. त्यांचे विद्यापीठ संगणक केंद्राकडून मॉनिटरिंग होत असते आणि फायरवॉलद्वारे ते हल्ले परतवूनही लावले जात असतात. त्यातूनही एखादे पृष्ठ प्रभावित झाल्यास अशा प्रकारचा संदेश दिसण्याची शक्यता असते, असेही रेडेकर यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2025
लोकमत

# मास कम्युनिकेशनच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उद्या शनिवारी आयोजित केला आहे. एम. ए. मास कम्युनिकेशन हा कोर्स २००५ साली सुरू झाला. या विभागाचे विद्यार्थी विविध पदांवर कार्यरत आहेत. मेळाव्याला माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JAN 2025
पुण्यनगरी

# 'डीवायपी'च्या विद्यार्थ्यांची शिवाजी विद्यापीठ संघात निवड

**कोल्हापूर :** कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांची विविध स्पर्धांसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे.

महाविद्यालयाचे रणवीर काटकर व अथर्व पाटील हे पंजाब येथे होणाऱ्या अखिल भारतीय नेमबाजी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करतील. ओंकार चोपडे याची भोपाळ येथे होणाऱ्या अखिल भारतीय मल्लखांब स्पर्धेसाठी, सौरीष साळुंखे याची काश्मीर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आईसस्टॉक स्पर्धेसाठी, सौख्या पाटील हिची जयपूर, राजस्थान येथे होणाऱ्या अखिल भारतीय नेटबॉल स्पर्धेसाठी, तर अंकिता मुरगुडे हिची पश्चिम विभागीय भारत स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. विद्यापीठ संघात झालेल्या निवडीबद्दल प्राचार्य डॉ. संतोष चेडे, रजिस्ट्रार डॉ. लितेश मालदे, अधिष्ठाता डॉ. राहुल पाटील, क्रीडा संचालक इजाज गडकरी यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांना डी. वाय. पाटील संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील व तेजस पाटील, कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.